|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon - 425001**

'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनी/नै.वि.२०२१-२२/ डी.ओ. 10 / 142 /२०२१ दिनांक : 23-06-2021

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
सदगुरु एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगाव
ता. जळगाव जि. जळगाव

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास मान्यतेबाबत

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी [Continuation of Affiliation] सादर केलेला प्रस्ताव.
२) दि. १०/०५/२०२१ रोजी आयोजित मा.अधिष्ठाता मंडळाची सभा.
३) मा. विद्या परिषद ठराव क्र. ४३/२०२१, दि.२७/०५/२०२१

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता संलग्निकरणाच्या नुतनीकरणास / नैसर्गिकविस्तारास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय क्रमांक ०१ च्या पत्रानुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात / मान्यता प्राप्त परिसंस्था संदर्भात संलग्निकरणाच्या नुतनीकरण / नैसर्गिकविस्ताराच्या मान्यता देणे संदर्भात कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभर लॉकडाऊनची परिस्थिती जाहिर करण्यात आली आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता स्थानिक तपासणी समितीने महाविद्यालयास / परिसंस्थेस प्रत्यक्ष भेटी दिलेल्या नसल्याकारणामुळे दिनांक ०७/०४/२०२१ रोजीच्या पत्रानुसार २२ मुद्द्यांची माहिती मागविण्यात आली. आपण सादर केलेली माहिती व प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी / तपासणी मा. अधिष्ठाता मंडळाकडून करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून सदर अहवालास मा. विद्यापरीषदेने मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

वरील अनुषंगाने आपणांस विदीत करण्यात येते की, <u>N.C.T.E. Norms & Standards</u>, 2014 नुसार आवश्यक बाबींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक राहील तसेच अनुषंगिक ज्या-त्या प्राधिकरणाची देखील मान्यता घेणे आवश्यक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयास देण्यांत येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता देण्यांत येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील. .

आपल्या महाविद्यालयात प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व ५०% शिक्षक या अटींची पूर्तता होत नसेल अशा महाविद्यालयांनी संबंधित रिक्त पदे ६ महिन्यात भरण्यात येतील अशा आशयाचे रु. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करण्याच्या अटीवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीत संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास विद्यार्थी प्रवेशासह मान्यता देण्यात येत आहे.

तथापि, ज्या महाविद्यालयांना सोबतच्या तक्त्यात प्रथम वर्ष करीता No Admission असे नमूद केलेले असेल अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता फक्त संलग्नीकरणाचे नुतनीकरणास/नैसर्गिक विस्तारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अशा महाविद्यालयांनी प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत तथापि, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व शिक्षक नियुक्तीसंदर्भात अटींची पूर्तता करण्याबाबत रू. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र सादर करण्यासह, रिक्त पदांच्या नियुक्तीसाठी पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे अनुषंगिक दस्ताऐवज सादर केल्यास व त्यास अनुसरून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळणेसंदर्भात विद्यापीठास प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थी प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल. मात्र विद्यापीठाच्या अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे.

तसेच ज्या संबंधीत महाविद्यालयांच्या केसेस अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत किंवा विद्यापीठ नियुक्त चौकशी समितीच्या शिफारसीस अनुसरून कार्यवाही प्रलंबीत असल्यास अशा महाविद्यालयांच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून किंवा मा. कुलगुरू महोदयांच्या / विद्यापीठ अधिकार मंडळाच्या अंतीम निर्णयाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

(ग. ना. पवार)
सहा.कुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता नुतनीकरणाचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा. विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषंद, मानस भवन, श्यामला हिल्स, भोपाळ-०२
३) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
४) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पहिला मजला जीवन प्राधिकरण भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगांव
५) मा. संचालक , परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौ उ. म. वि. जळगाव
६) मा. सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव
७) मा.उप/सहा.कुलसचिव, संबंधितविद्याशाखा, परीक्षाविभाग, कबचौ उ.म.वि.जळगांव
८) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव

जा.क्र. कबचौउमवि/५/नुतनी/नै.वि.२०२१-२२/ डी.ओ. 10/ 142/२०२१, दिनांक : 23-06-2021 चे सहपत्र

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचा तक्ता

| Name of College / Recognized Institute | Details of Additional Division for Nutanikaran for A.Y 2021-22 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2021-22 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Natural Growth for A.Y 2021-22 [As per Proposal] | **Approval of University to Continuation of Affiliation for A.Y.2021-22** |
|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| [E100103] - SADGURU EDUCATION SOCIETYS COLLEGE OF EDUCATION JALGAON Tal. Jalgaon Dist. Jalgaon | B.ED. (GENERAL) - First Year - 2[ 50 ] B.ED. (GENERAL) - Second Year - 2[ 50 ] | B.ED. (GENERAL) - First Year - All Compulsory Subjects - 100 B.ED. (GENERAL) - Second Year - All Compulsory Subjects - 100 | | Continuation of Affiliation has been granted for Academic Year 2021-22, subject to fulfillment of the things as mentioned in the letter within 03 months, however, preferably before submitting the proposals of Affiliation for A.Y. 2022-23. |

(ग. ना. पवार)
सहा.कुलसचिव
संलग्नता विभाग